अर्जुना नदीकाठावरील गावांसह राजापूर शहर ‘अलर्ट मोडवर’!

मुसळधार पावसामुळे करक येथील अर्जुना धरण नव्वद टक्के भरले

राजापूर : पुढारी वृत्तसेवा

गेले काही दिवस जोरदार पावसामुळे तालुक्याच्या पूर्व परिसरातील करक येथील अर्जुना धरण हे नव्वद टक्के भरले असून असाच पाऊस पडत राहिल्यास पुढील दोन, तीन दिवसांत धरण पूर्ण भरून त्याच्या सांडव्यावरून विसर्ग होऊ शकतो. त्यामुळे अर्जुनासह कोदवली नदीच्या पाण्याची धोका पातळी ओलांडण्याची शक्यता लक्षात घेऊन अर्जुना नदीकाठावरील गावांसह राजापूर शहराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

राजापूर तालुक्याच्या पूर्व परिसरात अर्जुना हा मोठे पाटबंधारे प्रकल्प असून दरवर्षी पावसाळ्यात ते पूर्ण भरते आणि नंतर सांडव्यावरून त्याचा विसर्ग केला जातो. या वर्षी मे महिन्यापासूनच पावसाला सुरुवात झाली असून जूनमध्ये पावसाचे प्रमाण चांगले राहिले होते. जुलै महिन्यातदेखील तेवढ्याच जोमाने पावसाचे प्रमाण राहिले आहे. गेले दोन दिवस पावसाचा जोर वाढला आहे. पडत असलेल्या पावसामुळे पूर्व परिसरातील करक येथील अर्जुना धरण हे जवळपास नव्वद टक्के भरले आहे.

दरम्यान, चोवीस तासांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. त्यामुळे आगामी दोन, तीन दिवसांत अर्जुना धरण पूर्ण क्षमतेने भरून जाईल आणि धरणाच्या सांडव्यावरून विसर्ग सुरू होईल. परिणामी अर्जुनासह कोदवली या उभय नद्यांच्या पाण्याची धोका पातळी ओलांडू शकते. त्यामुळे राजापूर शहरासह उभय नदीकाठावरील गावच्या ग्रामस्थांना लांजा पाटबंधारे उपविभागाच्या वतीने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

अर्जुना नदीच्या काठावर करक, तळवडे, पाचल, रायपाटण, चिखलगांव, गोठणे-दोनिवडे, शिळ, उन्हाळे, कोळवणखडी, सौंदळ, आडवली, परटवली, बागवेवाडी आदी गावे येतात. सर्व गावच्या ग्रामस्थांना खबरदारीबाबत कल्पना देण्यात यावी, अशा सूचना त्या गावचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील यांना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे प्रकल्प बांधकाम उपविभागीय अधिकारी यांच्या वतीने सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सिंधुदुर्ग वैद्यकीय महाविद्यालयातून डॉक्टर बाहेर पडणार की कंपाऊंडर?

कुडाळ : पुढारी वृत्तसेवा

सिंधुदुर्ग जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील त्रुटींबाबत कुडाळ - मालवणचे आ. नीलेश राणे यांनी विधीमंडळ पावसाळी अधिवेशनात आक्रमकपणे आवाज उठवत सरकारचे लक्ष वेधले. केंद्र सरकारच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत राज्य शासनाने सिंधुदुर्गचे जिल्हा रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेले. यामुळे जिल्हा रुग्णालयाची आरोग्य सेवाच मृत झाल्याचा आरोप करत आ. राणे यांनी करत सरकारलाच घरचा आहेर दिला.

या रुग्णालयात उपचारासाठी जाणाऱ्या प्रत्येक रुग्णाला गोवा-बांबुळी रुग्णालयात रेफर केले जाते. शासकीय मेडिकल कॉलेज वाटेल ते करू शकते काय?. येथील सिव्हिल सर्जनना कामच राहिले नाही. पहिल्या वर्षातले तीन कोर्स या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नाहीत. त्यासाठी लागणारे अध्यापक नाहीत. मग सिंधुदुर्ग महाविद्यालयातून ५ वर्षांनी डॉक्टर बाहेर पडणार की कंपाऊंडर? असा थेट सवाल करत आ. राणे यांनी सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इन्स्पेक्शनचा व्हाईट पेपर काढण्याची मागणी सभागृहात केली.

आ. राणे म्हणाले, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालय खाली झाले असून रुग्णांना उपचारासाठी बाहेर पाठवले जात आहे. शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना वेगळे नियम आणि वेगवेगळी व्यवस्था आहे का? असा प्रश्न आ.राणे यांनी केला. आ. राणे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी स्वतः सिंधुदुर्ग मेडीकल कॉलेजला भेट देऊन त्रुटी दूर करण्याचे आश्वासन दिले.

आ. राणे म्हणाले, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाची संपूर्ण आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे. सिव्हिल सर्जनना अधिकार नाहीत. सर्व अधिकार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातांना दिले आहेत, असे सांगत प्रशासकीय अनास्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

क्रिप्टो करन्सीच्या नावाखाली युवकाला साडेबारा लाखांना गंडा

सावंतवाडी : सावंतवाडी तालुक्यातील साटेली-कातवाडवाडी येथील सुमीत शेंडेकर या युवकाची क्रिप्टो करन्सीच्या नावाखाली तब्बल १२ लाख ५० हजार रुपयांना ऑनलाईन फसवणूक करण्यात आली.

याप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञाताविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेंडेकर यांच्या व्हॉट्सअॅप नंबरवर एका अज्ञात व्यक्तीने फायनान्स अॅप यूजरची बनावट लिंक पाठवली. या लिंकवर क्लिक करताच फिर्यादी शेंडेकर यांच्या खात्यातील १२ लाख ५० हजार इतकी रक्कम अन्य खात्यात ट्रान्स्फर झाल्यामुळे शेंडेकर यांची आर्थिक फसवणूक झाली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सरदार पाटील करत आहेत. सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या नवनवीन तंत्रांबाबत नागरिकांनी सतर्कतेचे आवाहन पोलिसांनी केले आहे. अनोळखी लिंक क्लिक न करणे, ओटीपी/बँक खाते माहिती शेअर न करणे, संशयास्पद मेसेज, कॉल्सपासून सावध राहणे आवश्यक, असे आवाहन अमोल चव्हाण यांनी केले.

चिपळुणातील ३९ शाळा इमारती गळक्या!

चिपळूण : चिपळूण तालुक्यातील ३९ शाळांना गळती लागली आहे. राज्य शासन पहिलीपासून हिंदीची सक्ती शिवाय सेमी इंग्रजी शाळा करण्याचा प्रयत्न करीत आहे. शासनाने हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतला असला तरी शाळांच्या पायाभूत सुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. तालुक्यातील तब्बल ३९ शाळांची अवस्था बिकट असून शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही या शाळांची दुरुस्ती न झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. प्राथमिक शाळांची अवस्था मात्र दिवसेंदिवस ढासळत आहे.

जाहीर सूचना

माझे अशिल श्री समीर लवू चराटकर यांनी दिलेल्या माहितीवरून ही जाहीर नोटीस देत आहे की माझे अशील खालील नमूद निवासी मिळकत मूळ भाडेकरू त्यांचे वडील लवू सखाराम चराटकर यांचे नावावरून स्वत:चे नावे हस्तांतरित करीत आहेत.

सदर मिळकतीबाबत जर कोणी व्यक्तीचा (विठ्ठल आत्माराम मुळीक), संस्थेचा, बँकेचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास माझ्या खालील पत्त्यावर व मा. मालमत्ता अधिकारी, एफ/ उत्तर विभाग, म्युनिसिपल बिल्डिंग, भाऊ दाजी लाड रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९ या पत्त्यावर आपली हरकत १५ दिवसांच्या आत पुराव्यानिशी सादर करावी. अन्यथा सदरहू दावे माझे अशीलावर बंधनकारक राहणार नाही.

मिळकतीचा तपशील:

रूम नं. १०, २ रा मजला, बी. एम. सी. बिल्डिंग नं. १५, रावळी कॅम्प, एम. ए. रोड, गायकवाड नगर, सायन कोळीवाडा, सायन पूर्व, मुंबई ४०००२२

ॲड. पूनम हाटले
पत्ता: ९/ २ रा मजला, विघ्नहर्ता सी एच एस,
हुतात्मा चाफेकर बंधु मार्ग, मुलुंड पूर्व,
मुंबई ४०००८१
मो.: ९८९२२७७५७०

तुतारी एक्स्प्रेसच्या इंजिनात बिघाड

कणकवली : पुढारी वृत्तसेवा

मुंबईवरून गोव्याच्या दिशेने जाणारी तुतारी एक्स्प्रेस शुक्रवारी सकाळी ११.३७ वा. कणकवली रेल्वे स्थानकात पोहोचली असता । इंजिनामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे निर्दशनास आले. बिघाड दुरुस्त होत नसल्याने वेर्णे-गोवा येथून नवीन इंजिन आणून एक्स्प्रेस दुपारी २.४३ वा. गोव्याच्या दिशेने मार्गस्थ करण्यात आली. इंजिन बिघाडामुळे तब्बल ३ तास एक्स्प्रेस कणकवली रेल्वे स्थानकात अडकून पडल्याने त्याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागला.

तुतारी एक्स्प्रेस कणकवली स्थानकात पोहोचल्यानंतर इंजिनातील तांत्रिक बिघाडाची माहिती रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना दिली. तसेच पर्यायी इंजिन येईपर्यंत तुतारी एक्स्प्रेस कणकवली रेल्वे स्थानकातच उभी राहील असेही, प्रशासनाकडून सांगितले. पर्यायी इंजिन हे वेर्णे-गोवा येथून रवाना कणकवलीच्या दिशेने मार्गस्थ झाले असल्याचेही सूत्रांकडून सांगण्यात आले. पर्यायी इंजिन कणकवली रेल्वे स्थानकात पोहोचल्यानंतर एक्स्प्रेस मार्गस्थ करण्यात आली. मात्र यासाठी ३ तासाचा विलंब झाला.

वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय

द्वारा: विशाल जुन्नर सहकारी पतपेढी [म.]

प्रशासकीय कार्यालय : बी/३,ससेक्स इंडस्ट्रीयल इस्टेट, दादोजी कोंडदेव क्रॉस रोड, भायखळा (पुर्व),
मुंबई-४०००२७ (नोंदणी क.:बी.ओ.एम./आर.एस.आर./९२८/१९७९)
दुरध्वनी :६६५७ १७११/२२/३३

जा.क्र.२६/वसुली वि./लिलाव नोटीस/वि.जु.स.प./१९/२०२५

नमुना झेड
नियम 107 पोटनियम (11ड/01)

स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतचे नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेला **वसुली अधिकारी श्री.बंडू बाळशिराम गहीने** (म.स.का.१९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) दि. ०४/०१/२०२२ रोजी **मागणी नोटीस** ऋणको **जितेंद्र यशवंत कदम** यांना देवुन नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम **रू. ७००६९९/- (अक्षरी रक्कम रूपये. सात लाख सहाशे नव्यान्नव)** व सदरची नोटीस मिळालेल्या दिनांक पासुन ऋणको यांना रक्कम भरणा करणेस कसुर केली आहे. खाली सही करणाऱ्यांनी **दि. ०१/०८/२०२२** रोजी अंतिम जप्तीची नोटीस रक्कम **रूपये. ७४४२८१/-(अक्षरी रक्कम रूपये सात लाख चव्वेचाळीस हजार दोनशे ऐक्याऐंशी फक्त)** दिली असुन पुढे निर्देशित केलेली मालमत्ता तात्वीक जप्त करण्यात आली आहे.

ऋणको ने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला या प्रमाणे नोटीस देण्यात येत आहे.आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना म.स.का, नियम १९६१ मधील नियम 107 पोटनियम (11ड/01) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २३/०५/२०२५ रोजी तात्वीक जप्ती केलेली आहे .

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येते की ,सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास विशाल जुन्नर सहकारी पतपेढी मर्यादित, यांच्या बोज्याची रक्कम **रूपये :८,२६,७२२/- रुपये आठ लाख सव्वीस हजार सातशे बावीस रुपये फकत (अधिक ०३.०७.२०२५ पासुनचे व्याज व अन्य प्रभार)** याला अधिन रहावे लागेल .

मालमत्तेचे वर्णन

पत्ता :- रूम नं.२७ पदमावती चाळ, वर्वे नगर, महाकाली मंदिर जवळ, महानगर बँक समोर, भटवाडी घाटकोपर (वेस्ट)४०००८४. (एरिया १०० स्के.फुट क्लिट अप)

दिनांक : ०३.०७.२०२५
ठिकाण : मुंबई

वसुली अधिकारी
श्री.बंडू बाळशिराम गहीने
(म.स.का,१९६० कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
द्वारा - विशाल जुन्नर सहकारी पतपेढी मर्या. मुंबई

वाटद एमआयडीसीबाबत आक्षेपांवर जनसुनावणी सुरु

भूसंपादनातून घरे, धार्मिक स्थळे, आंबाबागायती वगळण्याची मागणी

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

रिलायन्सला जागा उपलब्ध करून देण्यासाठी वाटद पंचक्रोशीत होऊ घातलेल्या एमआयडीसीसाठी शुक्रवारपासून प्रांताधिकाऱ्यांसमोर जनसुनावणी सुरू झाली झली. घरे व धार्मिक स्थळे, आंबा बागायती वगळणे, मोबदला, नोकऱ्या याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी आपली भूमिका मांडली. यावेळी प्रशासनाने सकारात्मकता दर्शवली आहे. एमआयडीसीनेही प्रदूषण विरहित प्रकल्प येणार असल्याचे लेखी स्पष्टीकरण प्रांताधिकाऱ्यांना दिले आहे. सोमवार ७ रोजी कळझोंडी गावची होणार सुनावणी होणार आहे.

वाटद व परिसरातील गावांमध्ये एमआयडीसी येऊ घातली असून, या बाबत संयुक्त मोजणी नुकतीच पूर्ण झाली आहे. त्याबाबत सहा गावांमधील ग्रामस्थांच्या असणाऱ्या आक्षेपांवर प्रांताधिकारी कार्यालयात सुनावणी सुरू झाली आहे. शुक्रवार ४ जुलै रोजी कोळीसरे व मिरवणे गावातील ग्रामस्थांची सुनावणी सकाळी सुरू झाली. यावेळी २७ अर्जदार व ३० खातेदारांना नोटीसा पाठवून बोलावून घेण्यात आले होते. मात्र, नोटीसा पाठवल्या पेक्षा अधिक ग्रामस्थ आपले म्हणणे घेऊन प्रांताधिकारी कार्यालयात उपस्थित होते. त्यांचे प्रांताधिकारी जीवन देसाई यांनी ऐकून घेतले.

> प्रदूषण विरहीत कंपन्या येणार असल्याचे एमआयडीसीने लेखी दिले आहे. दोन गावातील ग्रामस्थांनी आपले आक्षेप नोंदवत चर्चा केली. विशेषत: मोबदल्यासंदर्भात विचारणा करण्यात आली. सध्याचा बाजारभाव व २०१३च्या बाजारभावाप्रमाणे योग्य तो बाजारभाव लवकरच जाहीर केला जाईल
>
> \- **जीवन देसाई**
> प्रांताधिकारी

SBI | स्टेट बँक ऑफ इंडिया

एसएआरबी ठाणे : ११६९७, स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी ब्रॅन्च, १ ला मजला, प्लॉट क्र. ए-११२, सर्कल रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रीअल इस्टेट, ठाणे (पश्चिम)- ४०० ६०४. ई-मेल sbi.11697@sbi.co.in

परिशिष्ट ४-ए स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना (नियम ८(६) ची तरतूद पाहा)

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या अनुच्छेद ८(६) च्या तरतूदीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते व विशेषत: कर्जदार व हमीदारांना देण्यात येते की, खालील विवरणीत स्थावर मालमत्ता गहाण/प्रभारित प्रतिभूत धनकोच्या मालमत्तेचा स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे **प्रत्यक्ष ताबा** घेण्यात आला आहे व प्रतिभूत धनकोंची मालमत्ता खालील विवरणीत **श्री. ब्रीजमोहन मिश्रा व श्रीमती पूनम मिश्रा यांच्या संबंधात स्टेट बँक ऑफ इंडिया**, प्रतिभूत धनको यांच्या **दि. २१.०४.२०२२** रोजीनुसार **रु. ४८,८०,१५०/- (रु. अठ्ठेचाळीस लाख ऐंशी हजार एकशे पन्नास मात्र)** अधिक पुढील व्याज व प्रासंगिक खर्च व मूल्य आदी थकबाकीच्या वसुलीसाठी खालील निर्देशित प्रकरणांतील प्रभारित मालमत्तांचा **जशी आहे जेथे आहे तत्त्वावर व जशी आहे जी आहे तत्त्वावर दि. २२.०७.२०२५** रोजी घेण्यात येत आहे.

मालमत्तेचे **राखीव मूल्य रु. १,१७,००,०००/- (रु. एक करोड सतरा लाख मात्र) व इसारा रक्कम ठेव रु. ११,७०,०००/- (रु. अकरा लाख सत्तर हजार मात्र)** अशी आहे.

इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलाव करावयाच्या मालमत्तेवरील भार, मालमत्तेचे शीर्षक तसेच मालमत्तेवर प्रभाव पाडणारे दावे/हक्क/बिल्डर्सची देणी यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरातीचा अर्थ बँकेकडून कोणतीही वचनबद्धता वा कोणतेही सादरीकरण असा होत नाही. बँकेस ज्ञात तसेच अज्ञात अशा सर्व विद्यमान व भविष्यकालीन भारांसमवेत मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे.

लिलावाच्या तारखेपूर्वी बोलीदारांनी **(https://baanknet.com)** वर आवश्यक दस्तावेज व मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या पद्धतीनुसार नोंदणी शुल्क भरून स्वत:ला नोंदणी करावी.

जाहिर **ई-लिलावाची तारीख व वेळ दि. २२.०७.२०२५ रोजी दु. १.०० वा ते दु. ३.०० वाजेपर्यंत** १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह असेल.

मालमत्तेचा तपशील

फ्लॅट क्र. २४०४, २१ वा मजला, बी विंग, रुस्तमजी अझियानो बिल्डिंग, सर्व्हे क्र. १४/१, १५/२ ते ५, १६/२ए, ३ ते ६, १७/३, ४ए, ५ व ६ए, झोन क्र. ६/२७, गाव माजीवाडा, रुस्तमजी अर्बानिया कॉम्प्लेक्सजवळ, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे (पश्चिम)- ४००६०१. मोजमापित ६६.२४ चौ.मीटर, समतुल्य ७१३ चौ.फूट चटई क्षेत्र, श्री. ब्रीजमोहन मिश्रा व श्रीमती पूनम ब्रीजमोहन मिश्रा यांच्या नावे.

मालमत्ता आयडी क्र.	राखीव मूल्य (रु.)	इसारा रक्कम ठेव (रु.)	बोली विस्तारीत रक्कम (रु.)	परीक्षणाची तारीख व वेळ
एसबीआयएन २०००३५८४६८६२	रु. १,१७,००,०००/-	रु. ११,७०,०००/-	रु. १,००,०००/-	दि. १४.०७.२०२५ रोजी दु. १२.०० वा. ते दु. ३.०० वा.

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया **स्टेट बँक ऑफ इंडियाच्या** प्रदाते लिंक व प्रतिभूत धनको वेबसाइट **www.sbi.co.in** व **https://baanknet.com, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** व **https://baanknet.com** किंवा **श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, सीएओ मोबा. क्र. ७८७५५५१५६६ व श्री. अमित एम. साठे, सीओ.मोबा. क्र. ९८३४९३७००१ वर संपर्क करा.**

दिनांक : ०२.०७.२०२५
ठिकाण : ठाणे

सही/-
चंद्रकुमार डी. कांबळे
मुख्य महाव्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

सेवानिवृत्त ५ पोलिसांचा सन्मान

रत्नागिरी : पोलीस दलातून वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे नेमणूक लांजा उपविभाग, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुधीर कदम खेड पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक दीपक पवार पोलीस मुख्यालय रत्नागिरी, पोलीस उपनिरीक्षक विजय कदम, मिलिंद चव्हाण या ५ पोलीस अधिकाऱ्यांचा ‘सेवानिवृत्ती कार्यक्रम’ सोमवार ३० जून रोजी संपन्न झाला. यावेळी पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन प्रशंसा केली.

ग्रुप फार्मास्युटिकल्स लिमिटेड

सीआयएन : यु२४२३९एम एच १९८७पीएलसी ०२२८८९
नोंदणीकृत कार्यालय : डब्ल्यू - ४६, (बी) एम आय डी सी, तारापूर इंडस्ट्रिअल एरिया, ठाणे
महाराष्ट्र, ४०१ ५०६, **दूरध्वनी क्रमांक** : + ९१ ८०८७६५५१८८
संकेतस्थळ : https://www.grouppharma.com/ **ई मेल** : shareholder@grouppharma.in

४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

याद्वारे सूचित करण्यात येते की, ग्रुप फार्मास्युटिकल्स लिमिटेड (कंपनी) यांची **४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शनिवार दिनांक २६.०७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता** घेण्यात येणार आहे. कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे (एमसीए) जारी सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२४, दि. १९.०९.२०२४ व सेबी द्वारे जारी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/ सीएफडी - पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३, दि. ०३.१०.२०२४ तसेच वेळोवेळी जारी अधिसूचना (यामध्ये वेळोवेळी लागू अन्य वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश) यांच्या अनुपालनांतर्गत वार्षिक सर्वसाधारण सभा आमंत्रित करणारी सूचना दिनांकित २७.०६.२०२५ मध्ये नमूद केलेल्या विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी सदर एजीएम व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य मान्यताप्राप्त दृकश्राव्य माध्यमे (ओएव्हीएम) सुविधांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे, जी सुविधा मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड - कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट यांनी उपलब्ध करून दिली आहे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०१ च्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेण्ट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१५ चा नियम १८ आणि वरीलप्रमाणे नमूद केलेल्या एमसीए परिपत्रकाच्या अनुसार वार्षिक सर्वसाधारण सभा आमंत्रित करणाऱ्या सूचनेच्या आणि ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रति ई मेलच्या माध्यमातून अशा सभासदांना ०४.०७.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत ज्या सभासदांचे ई मेल तपशील कंपनी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स म्हणजेच बिग शेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (बिग शेअर)/ त्यांचे संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (डीपी) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. एजीएमची सूचना कंपनीचे संकेतस्थळ https://www.grouppharma.com येथे व सूचना बिगशेअरची (दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरविणारे आरटीए) वेबसाइट https://ivote.bigshareonline.com वरूनही प्राप्त करता येऊ शकेल. ही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सभासद ज्यांच्याकडे कंपनीचे समभाग प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध आहेत असे सभासद त्यांचा ई मेल आयडी आपला फोलिओ क्रमांक, समभागधारकाचे नाव, समभाग प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (मागून आणि पुढून), पॅन (पॅन कार्डची स्वयंसाक्षांकीत प्रत), आधार (आधार कार्डची स्वयंसाक्षांकीत प्रत) ई मेलच्या माध्यमातून बिग शेअर यांना prasadm@bigshareonline. com, pooja@bigshareonline.com येथे पाठवून प्राप्त करू शकतात. समभाग डीमटेरियलाइज्ड स्वरूपात असतील तर सभासदांनी आपले ई मेल तपशील त्यांच्या डीपी यांच्याकडे नोंदणीकृत करू शकतात.

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ च्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) सुधारणा नियम २०१५ चा नियम २०, आयसीएसआयद्वारे जारी सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष (एसएस-२) तसेच कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे वेळोवेळी जारी परिपत्रके यांच्या अनुपालनांतर्गत कंपनी आपल्या सभासदांना एजीएममध्ये विचारविनिमय करावयाच्या विषयांवर मत देण्यासाठी दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे. याकरिता कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान सुविधा पुरविण्यासाठी अधिकृत एजन्सी म्हणून मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे बिगशेअर म्हणून उल्लेखित) - कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) यांची नेमणूक केली आहे. बिगशेअर यांच्याद्वारे दूरस्थ ई-मतदान प्रणाली तसेच एजीएमच्या तारखेस ई-मतदानाद्वारे सभासदांना मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) सुधारणा नियम २०१५ चा नियम २०च्या अनुसार कंपनीने १९.०७.२०२५ ही तारीख दूरस्थ ई मतदान तसेच एजीएमच्या दरम्यान ई मतदान यांच्यासाठी सभासदांची पात्रता निर्धारित करण्यासाठी कट ऑफ तारीख म्हणून निश्चित केली आहे. अशा व्यक्ती ज्यांची नावे सभासद नोंद पुस्तिकेत तसेच लाभार्थी मालकांची यादी जी डिपॉझिटरीज यांनी तयार केली आहे, त्यामध्ये कट ऑफ तारीख म्हणजेच १९.०७.२०२५ रोजी नोंद आहे अशा व्यक्ती दूरस्थ ई मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई मतदानासाठी पात्र असतील.

दूरस्थ ई मतदान प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

(१) दूरस्थ ई मतदान प्रक्रियेला इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने प्रारंभ होण्याची तारीख आणि वेळ : बुधवार दिनांक २३.०७.२०२५ रोजी स. ९.०० वा.
(२) इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने दूरस्थ ई मतदान प्रक्रिया समाप्त होण्याची तारीख आणि वेळ : शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी सायं. ५. ०० वाजता.
(३) बिगशेअर यांच्याकडून शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी सायं. ५.०० पश्चात दूरस्थ ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल.
(४) सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ ई मतदान पद्धतीने आपला मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात, मात्र त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.
(५) सभासदांनी सूचनेत नमूद करण्यात आलेले ई मतदान सूचनेचे मुद्दे काळजीपूर्वक वाचावेत आणि कोणत्याही शंका असल्यास सभासद https://ivote.bigshareonline.com या संकेतस्थळावर डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स आणि आय व्होट ई-व्होटिंग मोड्युल यांचा संदर्भ घेऊ शकतात किंवा ०२२-६२६३८३३८ वर संपर्क साधू शकतात किंवा बिगशेअरचे अधिकारी श्री. गणेश सकपाळ, ई-व्होटिंग मॅनेजर यांना evoting@bigshareonline.com येथे संपर्क साधू शकतात.

एजीएमच्या दरम्यानही ई मतदान सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

जर एखादी व्यक्ती एजीएम सूचना निर्गमित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि कट ऑफ तारीख म्हणजेच १९.०७.२०२५ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत कंपनीची सभासद झालेली असेल तर तो / ती व्यक्ती बिगशेअर यांना त्यांचा ई मेल आयडी : //ivote.bigshareonline.com येथे संपर्क साधून युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी लिहू शकतात. भागधारक डीमॅट प्रकारात भागधारक असल्यास व यापूर्वीच https://ivote.bigshareonline.com च्या ई-मतदान प्रणालीवर नोंदणीकृत असल्यास व वा त्याने यापूर्वी एखाद्या कंपनीच्या मतदानात मतदान केलेले असल्यास ते लॉग इन करण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरू शकतात.

सभेचा तपशील कंपनीची वेबसाइट https://www.grouppharma.com वरही उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
ग्रुप फार्मास्युटिकल्स लिमिटेडकरिता
दीपक मोहन
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०७८२५७८०

स्थळ : मुंबई
दिनांक : ०४.०७.२०२५

PRIME FOCUS
LIMITED

प्राइम फोकस लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981
नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाउस, सिटी बँकेसमोर, लिंकिंग रोड,
खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२. **दूरध्वनी** : ०२२ - २६४८ ४९००
वेबसाइट : www.primefocus.com, **ई-मेल** : ir.india@primefocus.com

विशेष सर्वसाधारण सभेची सूचना व परोक्ष ई-मतदान/ई-मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपन्या कायदा, २०१३ (**"कायदा"**) च्या लागू तरतुदी व त्याअंतर्गत संस्थापित नियम तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ (**"सेबी विनियमन"**) सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे जारी परिपत्रके दि. ०८.०४.२०२०, १३.०४.२०२०, ०५.०५.२०२०, १५.०६.२०२०, २८.०९.२०२०, ३१.१२.२०२०, १३.०१.२०२१, ०८.१२.२०२१, ०५.५.२०२२, २८.१२.२०२२, २५.०९.२०२३ व १९.०९.२०२४ (**"एमसीए परिपत्रके"**) तसेच सूची विनियम नांच्या विशिष्ट तरतुदींच्या अनुपालनाशी संबंधित अतिरिक्त शिथिलतांसंदर्भात भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाद्वारे (**"सेबी"**) जारी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी - पीओडी - २/पी/सीआयआर/२०२४/१३३, दि. ०३.१०.२०२४ व यासंदर्भात जारी आवर्तपत्रके (**"सेबी परिपत्रके"**) यांच्या अनुपालनांतर्गत ईओजीएमची सूचना दि. ०३.०७.२०२५ (**"सूचना"**) मध्ये विहित कार्यानुसार विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी प्राइम फोकस लिमिटेड (कंपनी) च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. २६.०७.२०२५ रोजी स. ११.३० वा. (भा. प्र. वे.)** व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (**"व्हीसी"**) वा अन्य ऑडिओ व्हीज्युअल मीन्स (**"ओएव्हीएम"**) यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे. सदर सूचना कंपनीची वेबसाइट, [illegible] वर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (**"सीडीएसएल"**) ची वेबसाइट www.evotingindia.com, बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेस उपस्थित सहभागी सभासद कायद्याचे अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमकरिता गणले जातील. सदर ईओजीएमकरिताचे अपेक्षित ठिकाण हे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय अर्थात प्राइम फोकस हाउस, सिटी बँकेसमोर, लिंकिंग रोड,खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२ हे समजण्यात यावे.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ते कंपनी/कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफरएजंट -एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात) वा डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स यांच्याकडे नोंदवलेले आहेत अशा सभासदांना कंपनीच्या ईओजीएमची सूचना **शुक्रवार, दि. ०३.०७.२०२५** रोजी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात आली आहे.

कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४४ व सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष २ यांच्या अनुपालनांतर्गत **शनिवार, दि. १९.०७.२०२५ (निर्धारित अंतिम तारीख)** रोजीनुसार कागदोपत्री वा डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना सीडीएसएलद्वारे पुरविण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून ए) परोक्ष ई-मतदान व बी) एजीएमदरम्यान ई-मतदान यांच्या माध्यमातून एजीएमच्या सूचनेत विहित सर्व ठरावांवर आपली मते देता येतील व अशा ई-मतदानाद्वारे सदर विषयांवर विचारविनिमय करता येईल.

परोक्ष ई-मतदान कालावधी (अर्थात सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून मतदान) **मंगळवार, दि.२२.०७.२०२५ रोजी (स. ९.०० वा. भा. प्र. वे.)** सुरू होईल व **शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी सायं.५.०० वा. (भा. प्र. वे.)** संपेल. सदर कालावधीदरम्यान सभासद त्यांची मते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देऊ शकतील. **शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी सायं.५.०० वा.** पश्चात सीडीएसएलद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल. निर्धारित अंतिम तारखेनुसार कागदोपत्री स्वरूपातील वा डीमटेरियलाइज्ड स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना केवळ परोक्ष ई-मतदान सुविधा किंवा एजीएममध्ये ई-मतदान सुविधा, जी बाब लागू असेल त्यानुसार, प्राप्त करता येईल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तींनी सदर सूचना केवळ माहितीसाठी समजावी. सभासदाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर पुढे त्याला ते बदलता येणार नाही किंवा पुन्हा मत देता येणार नाही.

ईओजीएमकरिता उपस्थित असलेल्या ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले नसेल ते ईओजीएममध्ये सीडीएसएलच्या ई-मतदान पोर्टलवर लॉग इन करून आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. ईओजीएमच्या आधी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सभासदही ईओजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सहभाग घेऊ शकतील, परंतु त्यांना ईओजीएममध्ये पुन्हा मत देता येणार नाही. ठरावावर एकदा मत दिल्यानंतर व निश्चित केल्यानंतर सभासदास नंतर ते बदलता येणार नाही.

निर्धारित अंतिम तारखेनुसार ज्या व्यक्तीचे नाव सभासदांचे रजिस्टर किंवा डिपॉझिटरीज् द्वारे तयार करण्यात आलेल्या लाभार्थी मालकांचय रजिस्टरमध्ये नोंद असेल अशा व्यक्तीच केवळ दूरस्थ ई-मतदान तसेच ईओजीएम मध्ये मतदान सुविधा प्राप्त करू शकतील.

एखाद्या व्यक्तीने सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीची सभासद बनली असेल व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्तीने मत देण्यासाठी लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी स्वीकृत करावयाच्या प्रक्रियेकरिता कृपया सूचना वाचावी तसेच helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, जर सदर व्यक्ती यापूर्वीच परोक्ष ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे नोंदणीकृत असल्यास सदर व्यक्ती मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल. तुम्ही पासवर्ड विसरला असल्यास www.evotingindia.com वरील Forget User Details/Password या पर्यायाचा वापर करून तो रिसेट करू शकाल.

डीमटेरियलाइज्ड स्वरूपातील, कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या तसेच ई-मेल पत्ते नोंदवलेले नसलेल्या सभासदांकरिता परोक्ष ईमतदान तसेच ईओजीएममध्ये मतदानाचे स्वरूप एजीएम आयोजित करणाऱ्या सूचनेत परोक्ष ई-मतदान वा ईओजीएमदरम्यान ई-मतदानाकरिताच्या विस्तृत निर्देशांसमवेतदिलेले आहे. जे सभासद व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून ईओजीएममध्ये उपस्थित असतील व ज्यांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे ठरावावर आपले मत दिलेले नसतील त्यांना, मत देण्यास प्रतिबंध केलेला नसल्यास असे सभासद अध्यक्षांद्वारे घोषणेपश्चात आयोजित करण्यात येत असलेल्या ठरावांच्या चर्चेच्या समाप्तीच्या वेळी ईओजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे अशा ठरावांवर मत देण्यास पात्र असतील. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून ईओजीएममध्ये उपस्थित राहण्याकरिताचे निर्देश ईओजीएमच्या सूचनेतही दिलेले आहेत.

परोक्ष ई-मतदानासंदर्भात काही प्रश्न/शंका असल्यास तुम्ही www.evotingindia.com वरील e-voting manual पाहू शकता किंवा खालील ठिकाणी संपर्क साधू शकता :

ई-मेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत करण्याचे स्वरूप :

कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेले व ज्यांनी आपले ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नसतील अशा भागधारकांनी कृपया फॉर्म आयएसआर - १ मधून तपशील जसे फोलिओ क्र., भागधारकाचे नाव, शेअर प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील व मागील), पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) यांसमवेत डिजिटल स्वरूपात स्वाक्षरीत केलेले विनंतीपत्र कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट अर्थात एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) ('आरटीए') यांना सी १०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई -४०००८३, दूर. ०२२-४९१८६०००, फॅक्स : ०२२-४९१८६०६०, ई-मेल rnt.helpdesk@in.mpms.mufg.com येथे पाठवून किंवा कंपनीला ir.india@primefocus.com येथे पाठवून नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.

डीटेरियलाइज्ड स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांनी कृपया त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.

नाव व पद : श्री. राकेश दळवी, उप व्यवस्थापक
पत्ता : सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, ए विंग, २५ वा मजला, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
ई-मेल आयडी : helpdesk.evoting@cdslindia.com **दूरध्वनी क्र.** : १८००-२२-५५३३.

ई- मतदान प्रक्रिया नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कंपनीने श्री. मेहूल रावल, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. एसीएस १८३००, सीओपी नं. २४९७०) यांची परीनिरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

सभेमध्ये उपस्थित राहून मत देण्यास पात्र सभासद त्यांच्या ऐवजी उपस्थित राहून मत देण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करू शकतो. असे प्रतिनिधी हे कंपनीचे सभासद असण्याची आवश्यकता नाही. अर्थात एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत सदर एजीएम ही व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यामुळे सभासदांद्वारे प्रतिनिधीची नेमणूक करण्यासाठीची सुविधा एजीएमकरिता उपलब्ध नसेल व त्यामुळे सदर सूचनेसमवेत प्रतिनिधित्व फॉर्म व उपस्थिती पत्र जोडलेले नाही.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
प्राइम फोकस लिमिटेड करिता
सही/-
परिना शाह
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०४.०७.२०२५

कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई येथे

एमटीएनएल भवन, ३ रा मजला, स्ट्रॅन्ड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
मूळ अर्ज क्र. ९६४/२०२४

समन्स एक्झि. ११

कॅनरा बँक ...**अर्जदार**
विरुद्ध
श्री. महेन्द्र चतुर्वेदी अॅन्ड एएनआर. ...**प्रतिवादी**

ज्याअर्थी, **ओए/९६४/२०२४** सन्मा. पीठासीन अधिकारी/निबंधक यांच्यासमक्ष दि. ०३.१२.२०२४ रोजी सूचिबद्ध करण्यात आला.

ज्याअर्थी, सन्माननीय न्यायाधिकरणास तुमच्या विरोधात कर्ज **रु. ४२,११,१३१.८६/-** च्या वसुलीकरिता तुमच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या (ओए) दस्तावेज आर्दीच्या प्रतींसमवेत अर्ज जोडलेला आहे) अंतर्गत कायद्याचे अनुच्छेद १९(४) अंतर्गत समन्स/सूचना जारी करण्यास संतुष्टी होत आहे.

ज्याअर्थी सर्वसामान्य पद्धतीतून समन्सची सेवा बजावली जाऊ शकत नव्हती व ज्याअर्थी सदर सन्माननीय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी सेवेकरिता अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

कायद्याचे अनुच्छेद १९च्या उप-अनुच्छेद (४) अंतर्गत प्रतिवादींना याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की:-

१. समन्सच्या सेवेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, मागणी केलेले अनुतोष का पूर्ण करण्यात येऊ नयेत, याचे कारण द्यावे.
२. मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदारांद्वारे विहित मालमत्ता व संपत्तींव्यतिरिक्त अन्य मालमत्ता वा संपत्तींचा तपशील घोषित करावा.
३. मालमत्तांच्या जप्तीकरिता अर्जाची सुनावणी व वासलात प्रलंबित असल्याने, तुम्हाला मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत घोषित प्रतिभूत संपत्ती वा अन्य अशी संपत्ती व मालमत्ता यांचा व्यवहार करणे वा वासलात लावण्यापासून प्रतिबंध करण्यात येत आहे.
४. न्यायाधिकरणाच्या पूर्वसंमतीविना मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत तुम्हाला घोषित प्रतिभूत संपत्ती वा अन्य अशी संपत्ती व मालमत्ता यांची व्यवसायाच्या सर्वसाधारण कामकाजाव्यतिरिक्त अन्य स्वरूपात विक्री, भाडेकरार वा अन्य स्वरूपात हस्तांतरण करता येणार नाही.
५. व्यवसायाच्या सर्वसाधारण कामकाजातून प्रतिभूत संपत्ती वा अन्य संपत्ती व मालमत्तांच्या विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्री रकमेकरिताची खाते नोंद तुम्हाला करावी लागेल व अशा संपत्तींवरील प्रतिभूत हितसंबंध धारक असलेल्या बँक वा वित्तीय संस्थेकडे देखभालीत खात्यामध्ये अशी विक्री रक्कम जमा करावी लागेल.
६. तुम्हाला असेही निर्देश देण्यात येत आहेत की तुम्ही तुमचे लेखी म्हणणे सादर करावे ज्याची एक प्रत अर्जदारांना सादर करावी व तुम्ही निबंधकांकडे दि. २२.१०.२०२५ रोजी स. ११.०० वाजता उपस्थित राहावे.
७. अन्यथा तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय घेतला जाईल.

माझी सही व सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी **दि. ११.०६.२०२५ रोजी** जारी.

शिक्का

सही/-
निबंधक,
डीआरटी-२, मुंबई

प्रतिवादींचे नाव व पत्ता :-

१. **श्री. महेन्द्र चतुर्वेदी**, ए ४०४, धीरज सॉलिटेअर बिल्डिंग, चिंचोली बंदर रोड, मालाड पश्चिम, मुंबई - ४०००६४. तसेच : फ्लॅट क्र. ७०१, ७ वा मजला, बी विंग, टाईप- जे, कृष्णा गार्डन, विवा वृंदावन टाऊनशिप, डी मार्टजवळ, विरार पश्चिम, पालघर - ४०१३०३.
२. **श्री. योगेश चतुर्वेदी**, ई-१०५, १ ली गीता स्मृती सीएचएसएल, गीता नगर, फेज- ७, रेशन कार्ड ऑफिसजवळ, मिरा रोड पूर्व - ४०११०७.

---

iRIS इरीस बिझनेस सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : टी-२३१, टॉवर २, ३ रा मजला,
इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क, वाशी ४०० ७०३, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी क्रमांक : + ९१ २२ ६७२३ १०००, **ई-मेल** : cs@irisbusiness.com,
संकेतस्थळ : www.irisbusiness.com, **फॅक्स** : + ९१ २२ २७८१ ४४३४
सीआयएन : एल७२९००एमएच२०००पीएलसी१२८९४३

व्हिडीओ कॉन्फरन्सिंग / अन्य मान्यताप्राप्त दृकश्राव्य माध्यमे यांच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदान माहिती

याद्वारे सूचित करण्यात येते की, इरीस बिझनेस सर्व्हिसेस लिमिटेड (**‘कंपनी’**) यांच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा (**‘ईजीएम’** वा **‘सभा’**) शनिवार, दि. २६.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (**‘व्हीसी’**)/अन्य मान्यताप्राप्त दृकश्राव्य माध्यमे (**‘ओएव्हीएम’**) यांच्या माध्यमातून विशेष सर्वसाधारण सभेची सूचना दिनांकीत ०४.०७.२०२५ च्या अनुसार कार्यक्रमांच्या प्रमाणे घेण्यात येणार आहे. सामान्य परिपत्रके जी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांनी जारी केली आहेत (**‘एमसीए’**) ज्यात परिपत्रक क्रमांक ०९/२०२४, दि. १९.०९.२०२४ चा समावेश असेल तसेच परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३, दि. ०३.१०.२०२४ (**‘सेबी परिपत्रके’**), जे सिक्युरिटी अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (**‘सेबी’**) यांनी जारी केले आहे (एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रक यांचा एकत्रित उल्लेख परिपत्रके असा करण्यात येणार आहे) त्यांच्या अनुसार कंपनीने ईजीएम सूचना दि. ०४.०६.२०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना पाठविली आहे, ज्या सभासदांचे ई-मेल तपशील कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स (**‘आरटीए’**) तसेच डिपॉझिटरीज यांच्याकडे शुक्रवार दिनांक २७.०६.२०२५ रोजी नोंदणीकृत आहेत.

असे सभासद ज्यांचे ई-मेल तपशील नोंदणीकृत नाहीत/किंवा कंपनी/आरटीए यांच्याकडे नोंदणीकृत केलेले नाहीत असे सभासद विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेची सॉफ्ट कॉपी कंपनीला cs@irisbusiness.com येथे विनंती पाठवून प्राप्त करू शकतात किंवा एनएसडीएल यांना evoting@nsdl.com येथे विनंती पाठवून प्राप्त करू शकतात. त्याचप्रमाणे ईजीएमची सूचना आणि एक्स्प्लेनेटरी स्टेटमेंट कंपनीचे संकेतस्थळ www.irisbusiness.com येथे तसेच स्टॉक एक्स्चेंज संकेतस्थळे म्हणजेच बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.bseindia.com येथे तसेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.nseindia.com येथे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याची एक प्रत नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (**‘एनएसडीएल’**) यांचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ च्या अनुसार तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुसार आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स)नियम २०१५ चा नियम ४४ च्या अनुसार आणि सर्वसाधारण साबांच्या संदर्भात इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेले दिशानिर्देश (**‘एसएस-२’**) यांच्या अनुसार कंपनी आपल्या सभासदांना विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या विषयांवर ईजीएम पूर्वी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने तसेच ईजीएमच्या दरम्यान ई-मतदान पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे आणि त्यासाठी कंपनी ने इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एनएसडीएल यांची सेवा घेतली आहे. दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेच्या संदर्भातील तपशीलवार सूचना ईजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत.

कायद्याच्या तरतुदींच्या अनुसार आणि त्या अंतर्गत बनविण्यात आलेल्या नियमांच्या अनुसार तपशील पुढीलप्रमाणे आहे :

ए. विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या मुद्दयांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने काम काज घेण्यात येणार आहे.
बी. दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान प्रक्रिया सुरु होण्याची तारीख आणि वेळ : बुधवार, दि. २३.०७.२०२५ सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार)
सी. दूरस्थ इ मतदान पद्धतीने मतदान प्रक्रिया समाप्त होण्याची तारीख आणि वेळ : शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ संध्याकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार)
डी. सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की : (१) शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० नंतर (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार) दूरस्थ ई-मतदान प्रारूप एनएसडीएल यांच्याकडून बंद करण्यात येईल. आणि सभासदाने एकदा एखाद्या विषयावर मतदान केलेले असेल तर त्याला त्यात बदल करता येणार नाही. (२) वर नमूद करण्यात आलेली तारीख आणि वेळ उलटून गेल्यानंतर सभासदांना इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने मतदान करण्याची अनुमती असणार नाही. (३) सभासदांचे मताधिकार हे कट ऑफ तारीख म्हणजेच शनिवार, दि. १९.०७.२०२५ (कट ऑफ तारीख) रोजी कंपनीच्या एकूण पेड अप इक्विटी समभाग भांडवलात सभासदांकडे उपलब्ध असलेल्या समभागांच्या प्रमाणावर अवलंबून असेल. (४) बैठकीच्या दरम्यान देखील दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे आणि जे सभासद बैठकीला उपस्थित असतील आणि ज्यांनी विशेष सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे सभासद बैठकीच्या दरम्यान मतदान करू शकतात. (५) अशी व्यक्ती जिचे नाव कंपनीच्या सभासद नोंद पुस्तिकेत/लाभार्थी मालकांच्या यादीत कट ऑफ तारीख रोजी नोंदणीकृत आहे अशी व्यक्तीच विशेष सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने तसेच बैठकीच्या दरम्यान ई-मतदान पद्धतीने मतदान करण्यासाठी पात्र असेल. (६) ज्या सभासदांनी विशेष सर्वसाधारण सभेच्या पूर्वी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले आहे असे सभासद विशेष सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात मात्र त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.
ई. अशी कोणतीही व्यक्ती जी विशेष सर्वसाधारण सभेची सूचना निर्गमित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंपनीचे समभाग घेऊन कंपनीची सभासद झालेली आहे आणि कट ऑफ तारीख रोजी तिच्याकडे कंपनीचे समभाग आहेत तर अशी व्यक्ती evoting@nsdl.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. मात्र जर तो / ती व्यक्ती दूरस्थ ई-मतदानासाठी या आधीच एनएसडीएल/ सीडीएसएल यांच्याकडे नोंदणीकृत असेल तर तो/ती व्यक्ती त्याचा/तिचा सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड यांचा वापर करून मतदान करू शकते.
एफ. ईजीएममध्ये व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून सहभागी होण्याच्या प्रक्रियेचा सविस्तर तपशील तसेच दूरस्थ ई-मतदान पद्धती तसेच विशेष सर्वसाधारण सभेच्या दरम्यान इ मतदान यांच्या प्रक्रियेचा सविस्तर तपशील विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेत देण्यात येत आहे. सभासदांना आवाहन करण्यात येते की त्यांनी त्या तपशिलाचे काळजीपूर्वक वाचन करावे. ज्या सभासदांना ईजीएमच्या पूर्वी किंवा ईजीएमच्या दरम्यान ई-मतदान सुविधा तसेच आणि / किंवा व्हीसी / ओएव्हीएम यांच्या संदर्भात साहाय्याची आवश्यकता आहे त्यांनी कृपया ०२२-४८८६७००० वर संपर्क साधावा किंवा पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक यांना evoting@nsdl.com येथे ई-मेलवर विनंती पाठवावी किंवा श्री. संतोषकुमार शर्मा, कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी यांना संपर्क साधावा किंवा cs@irisbusiness.com येथे ई-मेलद्वारे संपर्क साधावा किंवा कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता : टी-२३१, टॉवर २, ३ रा मजला, इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क, वाशी स्टेशन, वाशी-४००७०३, दूर. + ९१ २२ ६७२३ १००० वर संपर्क साधावा.

मतदान प्रक्रिया योग्य आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी याची छाननी करण्यासाठी छाननी अधिकारी म्हणून कंपनीच्या संचालक मंडळाने रिषित शाह अॅन्ड कं.चे श्री. रिषित डी. शाह (सभासदत्व क्र. एफसीएस ९५२२, सी.ओ.पी. नं. २६८७०), कार्यरत कंपनी सचिव यांची नियुक्ती केली आहे.

सभासदांना आवाहन करण्यात येते की कंपनीकडून भविष्यातील पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून प्राप्त करण्यासाठी, जर समभाग डिमेटेरियलाइज्ड स्वरूपात असतील तर अशा सभासदांनी आपल्या ई-मेल तपशिलाची नोंदणी आपल्या डीपी यांच्याकडे आणि समभाग कागदोपत्री स्वरूपात असतील तर आपल्या ई-मेल तपशिलाची नोंदणी कंपनी/आरटीए यांच्याकडे करून घ्यावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
इरीस बिझनेस सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या करिता
सही/-
संतोषकुमार शर्मा
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
सभासदत्व क्र. एसीएस ३५१३९

दिनांक : ०४.०७.२०२५
ठिकाण : वाशी, नवी मुंबई